SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 Stat Cell : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/जिसांका/२०२२-२३/14 दिनांक : 19/04/2023

# परिपत्रक

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था.**

**विषय : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सन २०२२-२३**
अंतर्गत विहीत नमुन्यातील माहिती उपलब्ध करुन देणेबाबत....

**संदर्भ : १. क्र.जिसांका/को/जिसाआस/२०२३/१६७, दि.०३/०४/२०२३ रोजीचे जिल्हा सांख्यिकी कार्यालय, कोल्हापूर यांचे पत्र.**
**२. क्र.जिसांकासां/जिसाआस/२०२३/१७५, दि.०३/०४/२०२३ रोजीचे जिल्हा सांख्यिकी कार्यालय, सांगली यांचे पत्र.**
**३. क्र.जिसांकासां/सांस-०४/जिसाआस/२३/२०२३/१२९, दि.०३/०४/२०२३ रोजीचे जिल्हा सांख्यिकी कार्यालय, सातारा यांचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भाकित पत्रास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, दरवर्षी वरील कार्यालयाकडून जिल्हा अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षकांच्या संख्येची प्रवर्गनिहाय माहिती विहित नमुन्यात देण्याबाबत कळविण्यात येते. सदरची माहिती अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) या संकेतस्थळावर आपल्या महाविद्यालयानी भरलेल्या माहिती वरुन तयार करुन पाठविण्यात येते.

**सध्या सन २०२१-२२ साठी वेबपोर्टलवर माहिती नोंदविण्यात आलेली असून सन २०२२-२३ साठीचे सर्वेक्षण अद्याप सुरु झालेले नाही. सदर कारणांमुळे विद्यापीठाकडून संलग्नित महाविद्यालयातील वरील स्वरुपातील माहिती तुर्तास उपलब्ध करु शकलेली नाही. सदर अनुषंगाने वरील माहिती एकत्रित करण्यासाठी आपल्या महाविद्यालयाच्या Unishivaji या ई-मेल आयडीवर गुगल फॉर्म लिंक पाठविण्यात आलेली असून सदर फॉर्ममध्ये सन २०२२-२३ मधील प्रवेशित विद्यार्थी तसेच शिक्षकांची संख्या नोंदविण्यात यावी.**

महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सदर बाब आपल्या महाविद्यालयातील संबंधीत प्रशासकीय सेवक / कर्मचारी यांच्या निर्देशनास आणुन त्याप्रमाणे त्यांच्याकडून त्वरीत कार्यवाही करुन घ्यावी. सदर कार्यालयास **वरील माहिती दि. २९/०४/२०२३ पूर्वी सादर करावयाची असल्याने सदर माहिती गुगल फॉर्ममध्ये लवकर नोंदवून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.**

GOOGLE FORM LINK :- https://forms.gle/y9BJZXCwBFo8jQ338

**गुगल फॉर्ममध्ये माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयाने सांख्यिकी कक्ष, (खोली क्रमांक ३१३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

**प्र-कुलसचिव**